# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❁ गुरूवार, दि. १६ जुलै २०२६ ❁ वर्ष : १ ❁ अंक : ८६ ❁ पाने : ४ ❁ किंमत : ४ रू. ❁ Email : hinduprakashvarta@gmail.com


## शेत/पाणंद रस्ते योजने'साठी 'सह अध्यक्षां'ची नेमणूक : बावनकुळे

**मुंबई :** राज्यातील शेतकऱ्यांसाठी जिव्हाळ्याच्या असलेल्या 'मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजने'च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोठा निर्णय घेतला आहे. या योजनेच्या कामात अधिक सुसूत्रता आणण्यासाठी ९१ विधानसभा क्षेत्र स्तरीय समित्यांमध्ये 'सह अध्यक्ष' पदाची अधिकृत नेमणूक करण्यात आली असून, याबाबतचा शासन निर्णय जारी केला आहे.

## मुंबईत बनावट दुधाचा मोठा भांडाफोड; 575 लिटर भेसळयुक्त दूध जप्त

**मुंबई :** मुंबई गुन्हे शाखेच्या युनिट ११ ने गोरेगाव पश्चिम येथे भेसळयुक्त दूध तयार करून विक्री करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत दोन आरोपींना अटक करण्यात आली असून सुमारे ५७५ लिटर भेसळयुक्त दूध, दूध पॅकिंगसाठी वापरण्यात येणारे साहित्य आणि इतर वस्तू जप्त करण्यात आल्या आहेत. जप्त मालाची एकूण किंमत ७०,४०४ रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गोरेगाव पश्चिम येथील प्रेमनगर, लिंक रोडवरील अंकुर बिल्डिंगमध्ये आरोपी नामांकित कंपन्यांच्या दुधाच्या पिशव्यांमधील शुद्ध दूध काढून त्यात पाणी मिसळत होते. त्यानंतर त्या पिशव्या पुन्हा सील करून हे भेसळयुक्त दूध ग्राहकांना विकले जात होते.

# छत्रपती संभाजीनगरची पाणीपुरवठा योजना मुदतीत पूर्ण करा; नागरिकांना शुद्ध, नियमित पाणी द्या : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### जायकवाडी योजनेच्या कामाचा वर्षा येथे आढावा; अपूर्ण कामे, रस्त्यांची दुरुस्ती आणि वितरण यंत्रणा पूर्ण करण्याचे निर्देश

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**मुंबई :** छत्रपती संभाजीनगर शहरातील नागरिकांना शुद्ध व नियमित पाणीपुरवठा करण्यासाठी जायकवाडी प्रकल्पावर आधारित सुरू असलेली पाणीपुरवठा योजना कोणत्याही परिस्थितीत विहित मुदतीत पूर्ण करावी, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी दिले. वर्षा निवासस्थानी झालेल्या आढावा बैठकीत त्यांनी कंत्राटदार, महापालिका, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि पाणीपुरवठा विभागाला समन्वयाने काम पूर्ण करण्यास सांगत अपूर्ण कामांमुळे नागरिकांना पूर्ण क्षमतेने पाणी मिळत नसल्याबद्दल नाराजी



व्यक्त केली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पाण्याच्या टाक्यांची अपूर्ण बांधकामे, शहरातील वितरण व्यवस्था आणि उर्वरित पाइपलाइनचे काम तातडीने पूर्ण करावे. योजनेच्या सद्यस्थितीची स्थळ पाहणी करून कंत्राटदारासोबत स्वतंत्र बैठक घ्यावी. वितरण व्यवस्थेचे 'हायड्रोलिक टेस्टिंग' पूर्ण करून नळजोडण्यांचे प्रमाणही वाढवावे. कामाचा टप्पानिहाय आराखडा तयार करून पुढील बैठकीत सादर करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

जुन्या पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेच्या रिस्टोरेशनची कामे तातडीने पूर्ण करून खोदलेले रस्ते आणि खड्ड्यांची दुरुस्ती करावी. पावसाळ्यात नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत खड्ड्यांमुळे अपघात होणार नाहीत, याची दक्षता घेण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.

छत्रपती संभाजीनगर शहराच्या सन २०५२ पर्यंतच्या लोकसंख्येचा विचार करून दररोज ६०४ दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणीपुरवठ्याचे नियोजन या योजनेत करण्यात आले आहे. त्यासाठी शहरात ५९ पाण्याच्या टाक्या उभारण्यात येणार असून त्यापैकी २९ टाक्यांची कामे पूर्ण झाली आहेत. तसेच १,९११ किलोमीटरच्या पाणी वितरण जाळ्यापैकी १,२९१ किलोमीटर पाइपलाइनचे काम पूर्ण झाले असून आतापर्यंत ४६ हजार ५०० नळजोडण्या देण्यात आल्या आहेत. उर्वरित कामे पूर्ण झाल्यानंतर शहराला नियोजित क्षमतेने नियमित आणि शुद्ध पाणीपुरवठा होणार असल्याचे बैठकीत सांगण्यात आले.

बैठकीस सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, खासदार संदिपान भुमरे, आमदार सतीश चव्हाण, माजी खासदार डॉ. भागवत कराड उपस्थित होते. दूरदृश्य प्रणालीद्वारे मंत्री अतुल सावे आणि गुलाबराव पाटील सहभागी झाले. महापौर समीर राजूरकर, उपमहापौर राजेंद्र जंजाळ, स्थायी समिती अध्यक्ष अनिल मकरिये, महापालिका आयुक्त अमोल येडगे, जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्यासह वरिष्ठ अधिकारी बैठकीस उपस्थित होते.

## थोडक्यात वार्ता

### सैनिकांच्या गोळीबारात PoK मध्ये 12 नागरिकांचा मृत्यू

मुझफ्फराबाद : पाकिस्तानव्याप्त काश्मीर (POK)मध्ये सरकारविरोधी आंदोलन अधिक तीव्र झाले असून, मंगळवारी आंदोलक आणि सुरक्षा दलांमध्ये झालेल्या संघर्षात 12 जणांचा मृत्यू झाला आहे. या पार्श्वभूमीवर पाकिस्तानने 4 हजार रेंजर्स, पोलीस आणि फ्रंटियर कॉर्प्सचे जवान तैनात केले असून, बुधवारी मुझफ्फराबादकडे निघणाऱ्या मोठ्या मोर्चामुळे तणाव अधिक वाढला आहे.पाकिस्तानने जॉइंट आवामी ॲक्शन कमिटी (JAAC) या संघटनेला प्रतिबंधित आणि सशस्त्र संघटना घोषित केले असले, तरी संघटनेने आंदोलन सुरूच ठेवले आहे. JAACच्या दाव्यानुसार, सुमारे 40 हजार आंदोलक मुझफ्फराबादकडे मोर्चा काढण्याच्या तयारीत आहेत.

### भररस्त्यात पत्नीची निर्घृण हत्या; आरोपी पतीला अटक

**मुंबई :** अंधेरी पश्चिमेतील ओशिवरा परिसरात कौटुंबिक वादातून एका व्यक्तीने पत्नीची भररस्त्यात निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ही घटना मंगळवारी संध्याकाळी आदर्श नगर येथील वाहतूक सिग्नलजवळ घडली असून, आरोपी पतीला पोलिसांनी अटक केली आहे. पती-पत्नीमध्ये वाद झाल्यानंतर आरोपीने प्रथम पत्नीवर दगडाने हल्ला केला. त्यानंतर धारदार चाकूने तिच्या गळ्यावर वार केल्याचा आरोप आहे. हल्ल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पळून गेला. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या महिलेला तातडीने कूपर रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारापूर्वीच डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.

### विनायक राऊत यांच्यावर अटकेची टांगती तलवार

**मुंबई :** उबाठा गटाचे माजी खासदार विनायक राऊत यांच्या अडचणीत कमालीची वाढ झाली असून, सुनेच्या छळ प्रकरणात त्यांना तात्काळ अंतरिम संरक्षण देण्यास न्यायालयाने नकार दिला आहे. राऊत यांनी दाखल केलेल्या अटकपूर्व जामीन अर्जावर आता २३ जुलै रोजी मुख्य सुनावणी होणार असून, तोपर्यंत त्यांना न्यायालयाचे कोणतेही संरक्षण लाभलेले नाही.

### 15 वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार, गुन्हा दाखल

**अहिल्यानगर :** संगमनेर तालुक्यातील एका गावात एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीचा गैरफायदा घेऊन तिच्यावर बळजबरीने अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पीडित मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी गणेश चंद्रभान गायकवाड (वय २८, रा. खांडगाव, संगमनेर) याच्याविरुद्ध संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे खांडगाव आणि परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

### नौदल प्रमुख कृष्णा स्वामीनाथन यांनी घेतली राज्यपालांची भेट



**मुंबई, दि. १५ :** भारतीय नौसेनेचे नवनियुक्त प्रमुख ॲडमिरल कृष्णा स्वामीनाथन यांनी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची लोकभवन, मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली. यावेळी राज्यपालांनी ॲडमिरल स्वामीनाथन यांचे नौदल प्रमुखपदी नियुक्ती झाल्याबददल अभिनंदन केले, तसेच स्मृती चिन्ह देऊन त्यांचा सत्कार केला.

## "शाल जोडे"




# पिसादेवी रस्त्यावरील अपघाती मृत्यूनंतर नागरिकांचा रस्ता रोको

### पोलिसांच्या मध्यस्थीनंतर दीड तासाने आंदोलन मागे

हिंदू प्रकाशवार्ता / प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मिसारवाडी ते पिसादेवी दरम्यानच्या अत्यंत सदोष सिमेंट रस्त्यामुळे मंगळवारी (१४ जुलै) रात्री आणखी एका निष्पाप नागरिकाचा बळी गेला. या घटनेमुळे संतप्त झालेल्या शेकडो नागरिकांनी आज, १५ जुलै रोजी सकाळी ११ वाजता थेट रस्त्यावर उतरत तीव्र आंदोलन केले. तब्बल दीड तास चाललेल्या या 'रास्ता रोको' आंदोलनामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूला वाहनांची मोठी कोंडी झाली होती. अखेर पोलीस आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी दोन दिवसांत रस्ता दुरुस्त करण्याचे आश्वासन दिल्यानंतर नागरिकांनी आंदोलन मागे घेतले.

या अपघाताप्रकरणी हर्सूल पोलिसांनी रवींद्र पाटील यांच्या मृत्यूला जबाबदार धरून ट्रॅक्टर (क्र. एमएच ३५ जी ६७९३) च्या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी मृत रवींद्र यांचे

-> पान 2 वर



**संतप्त नागरिकांचा माऊली सुपर मार्केटसमोर ठिय्या**

**बुधवारी सकाळी ११ वाजता नागरिकांच्या संतापाचा उद्रेक झाला. शेकडो नागरिक अपघात झालेल्या माऊली सुपर मार्केटसमोर रस्त्यावर एकत्र आले आणि त्यांनी ठिय्या मांडला. 'जोपर्यंत दोषी ठेकेदार आंदोलनस्थळी येत नाही, तोपर्यंत उठणार नाही', असा आक्रमक पवित्रा नागरिकांनी घेतला. परिस्थिती तणावपूर्ण होत असल्याचे पाहून सहाय्यक पोलीस आयुक्त मनोज पगारे, हर्सूल पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक स्वाती केदार, आणि सिडको पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अतुल येरमे यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. आंदोलकांनी यावेळी संबंधित कंत्राटदाराविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा आणि मृत पाटील यांच्या वारसांना ५० लाख रुपयांची मदत द्यावी, या मागण्या लावून धरल्या.**

### दोन दिवसांत रस्ता दुरुस्तीचे आश्वासन, पोलिसांनी घेतली जबाबदारी

**आंदोलनामुळे अवघ्या १५ मिनिटांत रस्त्याच्या दोन्ही बाजूला वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. वाहतूक कोंडी वाढल्याने परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये म्हणून पोलीस निरीक्षक अतुल येरमे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्याला तातडीने घटनास्थळी बोलावून घेतले. या अधिकाऱ्याने नागरिकांशी चर्चा करून येत्या दोन दिवसांत रस्ता दुरुस्त करण्याचे आश्वासन दिले. नागरिकांनी या आश्वासनाची लेखी मागणी केली असता, पोलीस निरीक्षक अतुल येरमे यांनी पुढाकार घेऊन, "जर दोन दिवसांत काम झाले नाही, तर मी स्वतः या अधिकाऱ्याला पुन्हा तुमच्यासमोर घेऊन येईल," असे सांगून नागरिकांना आश्वस्त केले. या मध्यस्थीनंतर दीड तासाने नागरिकांनी आंदोलन मागे घेतले. या आंदोलनात पंढरीनाथ गोडसे, देवराज बचके, उदयराज गायकवाड, राहुल मते, शुभम देशमुख, नरहरी गोरे, योगेश शिंदे, सूरज जोशी, उमेश नरवडे, सुरेश जाधव, संतोष राजगुरे, संदीप थोरात, अविनाश इंगळे, दिनेश देशमुख, सुनील देशमुख यांच्यासह शेकडो नागरिकांनी सहभाग घेतला होता.**

## सीईटीए' करारामुळे शेतकरी, उद्योजक आणि एमएसएमईंना नवी गती : पंतप्रधान

नवी दिल्ली : भारत आणि युनायटेड किंगडम यांच्यातील 'सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार करार' आणि ऐतिहासिक 'सामाजिक सुरक्षा करार' बुधवारी अधिकृतपणे लागू झाले आहेत. या निर्णयाचे स्वागत करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी याला भारत-यूके भागीदारीतील एक "महत्त्वाची घटना" असल्याचे म्हटले आहे. हे दोन करार उच्च-स्तरीय राजनैतिक महत्त्वाकांक्षांना "प्रत्यक्ष संधींमध्ये" रूपांतरित करतील, विशेषतः भारताच्या कृषी क्षेत्रासाठी आणि लघु उद्योगांसाठी, असे पंतप्रधान मोदींनी अधोरेखित केले.

पंतप्रधान मोदींनी 'एक्स'वर पोस्ट करत म्हटले की, या करारामुळे आर्थिक संबंध अधिक दृढ होतील. "सीईटीए करारामुळे आमच्या शेतकऱ्यांना, उद्योजकांना आणि एमएसएमईंना नवी गती मिळेल. अनेक क्षेत्रांना यूकेच्या बाजारपेठेत अधिक चांगली पोहोच मिळेल. तसेच, तंत्रज्ञान, व्यावसायिक सेवा आणि नवनिर्मितीमधील सहकार्य अधिक खोलवर जाईल आणि कुशल भारतीय प्रतिभेच्या गतिशीलता वाढण्यास मदत होईल," असे त्यांनी नमूद केले. पंतप्रधान पुढे म्हणाले, "सामाजिक सुरक्षा करारामुळे यूकेमध्ये तात्पुरत्या स्वरूपात काम करणाऱ्या भारतीय व्यावसायिकांना अमूल्य आधार मिळेल आणि भारतीय उद्योगांची स्पर्धात्मकता वाढेल. हा क्षण आपल्या लोकशाही देशांमधील परस्पर विश्वास आणि व्यापार, तंत्रज्ञान, गुंतवणूक व नवनिर्मितीद्वारे चालणारी भविष्याभिमुख भागीदारी निर्माण करण्याचा आमचा संकल्प दर्शवतो. भारत आणि यूके सामायिक समृद्धीसाठी एकत्रितपणे काम करणे सुरू ठेवतील."

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनीही या घडामोडींची घोषणा केली.

## अन्न व औषध प्रशासनाची धडक मोहीम; दुधाचे नमुने पाठविले तपासणीसाठी

**परभणी :** महाराष्ट्र राज्यातील नागरिकांना सुरक्षित व भेसळमुक्त अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत, यासाठी अन्न व औषध प्रशासनाच्या वतीने राज्यभर धडक मोहीम राबविण्यात येत आहे. अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार परभणी येथे दूध भेसळीविरोधात विशेष कारवाई करण्यात आली.

अन्न व औषध प्रशासनाच्या कार्यालयाने शहरातील वसमत रोडवरील काळी कमान व शिवशक्ती कॉर्नर परिसरात दुचाकीवरील कॅनमधून तसेच रस्त्यावरील स्टॉलवर किरकोळ दूध विक्री करणाऱ्या ९ विक्रेत्यांकडून दुधाचे नमुने घेतले.हे नमुने प्रयोगशाळेत विश्लेषणासाठी पाठविण्यात आले असून अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधितांविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येणार आहे. ही कारवाई अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली, सहाय्यक आयुक्त (अन्न) अ. ए. चौधरी व पवन खताळ तसेच सह आयुक्त (अन्न) एस. आर. करकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी वैभव ठोंबरे, कृष्णा मुळे, तुषार घोपे आणि अमृता दुधाटे यांच्या पथकाने केली.

दुधातील भेसळ रोखण्यासाठी अशा धडक मोहिमा पुढेही सुरू राहणार असल्याचे अन्न व औषध प्रशासनाने स्पष्ट केले आहे. जिल्ह्यातील सर्व अन्न व्यवसायिकांनी परवाना किंवा नोंदणी घेऊनच व्यवसाय करावा तसेच अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ आणि संबंधित नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध दंडात्मक कारवाई, परवाना निलंबन किंवा रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

# दोन आठवड्यांच्या प्रतीक्षेनंतर अखेर पावसाचे दमदार पुनरागमन; बळीराजाला मोठा दिलासा

### जून कोरडा, जुलैच्या सुरुवातीनंतर पुन्हा खंड; अखेर सरसावलेल्या सरींनी खरीप पिकांना मिळाले नवजीवन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** सलग दोन आठवडे पावसाने दांडी मारल्याने चिंतेत सापडलेल्या मराठवाड्यातील शेतकऱ्यांना अखेर दिलासा मिळाला आहे. गुरुवारी दुपारनंतर शहरासह जिल्ह्यात अनेक भागांत पावसाने दमदार हजेरी लावली. कोमेजण्याच्या मार्गावर असलेल्या खरीप पिकांना या पावसामुळे नवसंजीवनी मिळाली असून, शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा समाधान दिसू लागले आहे.



यंदाचा जून महिना बहुतांश कोरडाच गेल्याने शेतकरी सुरुवातीपासूनच चिंतेत होते. जुलैच्या पहिल्या आठवड्यात झालेल्या पावसावर विश्वास ठेवून शेतकऱ्यांनी सोयाबीन, कापूस, तूर, मका, मूग, उडीद आदी खरीप पिकांची पेरणी केली होती. मात्र त्यानंतर सलग दोन आठवडे पाऊस गायब झाल्याने पिकांच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते.

दररोज आकाशात ढगांची गर्दी होत होती, गार वारेही वाहत होते; पण पावसाचा एक थेंबही पडत नव्हता. वाढते ऊन आणि जमिनीतील कमी होत चाललेला ओलावा यामुळे अनेक ठिकाणी पिके सुकण्याच्या मार्गावर होती. शेतकरी रोज आभाळाकडे डोळे लावून पावसाची वाट पाहत होते.

अखेर दोन आठवड्यांच्या प्रतीक्षेनंतर पावसाने दमदार पुनरागमन केले. शहरासह ग्रामीण भागात झालेल्या पावसामुळे शेतांमध्ये पुन्हा ओलावा निर्माण झाला असून कोमेजलेल्या पिकांना नवजीवन मिळाले आहे. शेतकरी वर्गाने या पावसाचे समाधानाने स्वागत केले.

यंदाच्या हंगामासाठी बियाणे, खते, औषधे, मशागत आणि मजुरीवर मोठा खर्च केलेल्या शेतकऱ्यांसाठी हा पाऊस अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे. दुबार पेरणीचे संकट काही प्रमाणात टळण्याची आशा निर्माण झाली असून खरीप हंगामाला नवसंजीवनी मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.

पिकांची वाढ चांगली होण्यासाठी पुढील काही दिवस नियमित आणि समाधानकारक पाऊस होणे गरजेचे आहे. तरीही दोन आठवड्यांच्या प्रतीक्षेनंतर बरसलेल्या या सरींनी बळीराजाच्या चेहऱ्यावर पुन्हा एकदा आशेचे हास्य फुलवले आहे.

# खा. भागवत कराड यांच्या प्रयत्नातून सुरु करण्यात आलेला 'अहिल्यादेवी होळकर' साउंड अँड लेझर शो संकटात

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता / संतोष करपे

**छत्रपती संभाजीनगर :** खुलताबाद तालुक्यातील जागतिक कीर्तीच्या वेरूळ येथे पर्यटक आणि बारावे ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वर मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनकार्याची माहिती देण्यासाठी सुरू करण्यात आलेला 'साउंड अँड लेझर शो' सध्या आर्थिक आणि प्रशासकीय उदासीनतेमुळे बंद पडण्याच्या मार्गावर असल्याचे चित्र आहे. कोट्यवधी रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची प्रभावी




प्रसिद्धी न झाल्याने प्रेक्षकसंख्या अत्यल्प झाली असून, प्रकल्पावर आर्थिक संकट ओढवले आहे.

माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांच्या विशेष प्रयत्नांतून आणि 'गेल इंडिया'च्या (CSR) निधीतून 'ब्रॉडकास्ट इंजिनिअरिंग कन्सल्टंट्स इंडिया लिमिटेड' (BECIL) या संस्थेमार्फत तीर्थकुंड परिसरात हा साउंड अँड लेझर शो साकारण्यात आला. १२ मार्च २०२४ रोजी या प्रकल्पाचे लोकार्पण मोठ्या उत्साहात अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले होते. मात्र, त्यानंतर या उपक्रमाच्या प्रचार-प्रसाराकडे संबंधित यंत्रणांनी दुर्लक्ष केल्याची चर्चा आहे.

दररोज हजारो भाविक श्री घृष्णेश्वर मंदिरात दर्शनासाठी येतात. तसेच, वेरूळ लेणी पाहण्यासाठीही मोठ्या संख्येने देश-विदेशातील पर्यटक येथे भेट देतात. मात्र, साउंड अँड लेझर शोची वेळ, ठिकाण आणि माहिती दर्शविणारे फलक किंवा दिशादर्शक मंदिर परिसरासह अन्य प्रमुख ठिकाणी नसल्याने बहुतांश पर्यटकांना या उपक्रमाची माहितीच मिळत नाही. परिणामी, दररोज केवळ १० ते १२ प्रेक्षक शो पाहण्यासाठी उपस्थित राहत असल्याचे सांगितले जात आहे.

प्रेक्षकसंख्या घटल्याने प्रकल्पाच्या उत्पन्नावर परिणाम झाला असून, सुमारे पाच लाख रुपयांचे वीजबिल थकीत आहे. त्यामुळे वीजपुरवठा खंडित होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याशिवाय, येथे कार्यरत कर्मचाऱ्यांचे गेल्या सहा महिन्यांपासून मानधनही मिळाले नसल्याने त्यांच्यावर आर्थिक संकट कोसळले आहे.

कोट्यवधींच्या खर्चातून उभारण्यात आलेला हा सांस्कृतिक व पर्यटनविषयक महत्त्वाचा प्रकल्प केवळ नियोजनाच्या अभावा मुळे बंद पडण्याच्या उंबरठ्यावर आला आहे. या प्रकल्पाचे अस्तित्व टिकविण्यासाठी व्यापक प्रसिद्धी, आवश्यक आर्थिक तरतूद आणि प्रशासकीय पातळीवर तातडीने उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिक आणि पर्यटनप्रेमींकडून होत आहे.

# सं पा द की य

## सायबर हल्ल्यांचे महासंकट आणि राष्ट्रीय सुरक्षेचे आव्हान

तमिळनाडू येथील कुडनकुलम अणुऊर्जा प्रकल्पाशी संबंधित अत्यंत गोपनीय माहिती सायबर हल्ल्याद्वारे चोरीला जाणे आणि ती थेट 'डार्क वेब'वर प्रसिद्ध होणे, ही भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेला लागलेला एक अतिशय मोठा आणि धक्कादायक तडाखा आहे. कुडनकुलम हा केवळ देशातील सर्वात मोठा अणुऊर्जा प्रकल्प नाही, तर तो भारताच्या ऊर्जा स्वावलंबनाचा आणि धोरणात्मक सुरक्षेचा एक अत्यंत महत्त्वाचा कणा आहे. अशा अत्यंत संवेदनशील प्रकल्पाचे आराखडे, पुरवठादारांचे तपशील, अंतर्गत बैठकांचे इतिवृत्त आणि उपकरणांची पडताळणी अहवाल एका रॅन्समवेअर ग्रुपने सार्वजनिक करणे, ही केवळ एका व्यावसायिक समूहाची फसवणूक नसून देशाच्या सार्वभौमत्वाला मिळालेला थेट इशारा आहे. या सायबर हल्ल्याची जी पार्श्वभूमी समोर येत आहे, ती डिजिटल सुरक्षेच्या दाव्यांमधील पोकळपणा उघड करणारी आहे. या प्रकल्पाचे डिझाईन आणि बांधकामाचे कंत्राट असलेल्या रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरने दिलेल्या स्पष्टीकरणानुसार, 'योट्टा' या डेटा सेंटर सर्व्हरवरील डेटामध्ये छेडछाड झाली आहे. वर्ल्ड लीक्सने रिलायन्सच्या तब्बल साडेआठ लाखांहून अधिक फाईल्स डार्क वेबवर टाकल्या असून, त्यातील १९ हजार फाईल्स कमालीच्या संवेदनशील आहेत. आंतरराष्ट्रीय सुरक्षा तज्ज्ञांनी व्यक्त केलेली भीती अत्यंत रास्त आहे; कारण अणुप्रकल्पाच्या तांत्रिक रचनेची माहिती शत्रू देशांच्या किंवा दहशतवादी संघटनांच्या हाती लागल्यास, त्या प्रकल्पावर भौतिक किंवा डिजिटल हल्ला करणे त्यांना सहज शक्य होऊ शकते. हा धोका केवळ वीज निर्मिती ठप्प होण्यापुरता मर्यादित नसून, अणुप्रकल्पातील किरणोत्सर्गासारख्या अत्यंत विनाशकारी संकटाला आमंत्रण देणारा ठरू शकतो. भारतात गेल्या काही वर्षांत शासकीय आणि निमशासकीय संस्थांवर, तसेच मोठ्या औद्योगिक समूहांवर होणाऱ्या सायबर हल्ल्यांच्या प्रमाणात कमालीची वाढ झाली आहे. यापूर्वी टाटा आणि नाईकी सारख्या मोठ्या संस्थांवरही असे हल्ले झाले आहेत. यावरून स्पष्ट होते की, आपली डिजिटल सुरक्षा यंत्रणा अजूनही आंतरराष्ट्रीय पातळीवरील हॅकर्सच्या तुलनेत कमकुवत आहे. केवळ तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे पुरेसे नाही, तर त्याची सुरक्षा करण्यासाठी 'मिलिटरी-ग्रेड' सायबर सुरक्षा कवच निर्माण करणे ही काळाची गरज बनली आहे. सरकारने या घटनेचा केवळ एक 'माहिती चोरी' म्हणून तपास न करता, यामागील आंतरराष्ट्रीय कटकारस्थान शोधून काढले पाहिजे. अशा संवेदनशील प्रकल्पांचे कंत्राट खाजगी कंपन्यांकडे देताना, त्यांच्या सायबर सुरक्षेचे ऑडिट कडक नियमांनी आणि नियमितपणे केले जाणे आता अनिवार्य झाले आहे.

# अमानवीय क्रौर्यामुळे अनेक शाळा तरूणांचे बळी..!

माणसाने माणसाशी माणसासारखे कसे वागावे याचे धडे जन्माला येणाऱ्या बालकांना लहाणपणापासूनच दिले तरच असे बालक सद्विचारी,सदाचारी आणि माणुसकीचा धर्म जपणारे विधायक विचारांचे जबाबदार नागरीक म्हणून पुढे येऊ शकतात.नुसत्या पुस्तकी ज्ञानासाठी शाळेत पाठविणे,फक्त शाळेवर भिस्त ठेवणे. अशा वागण्यातून पालकत्वाच्या जबाबदारीपासून दुर राहिल्याने मानवी समाजाला अनेक धक्कादायक प्रसंगांना सामोरे जावे लागत आहे. बालकावस्थेपासून तर तारूण्याकडे वाटचाल करणारे युवक घरात कसे वागतात, समाजात, शाळेत कसे राहतात.शाळेत आणि बाहेर शिक्षक आणि मित्रांसोबत त्यांचे वर्तन कसे आहे,ते कुणाला त्रास देतात,की त्यांना त्रासदायक,अपमानकारक वागणुकीला सामोरे जावं लागत आहे याचं निरीक्षण पालकांनी करत राहिलं पाहिजे.बदलेल्या वळणावर त्याची वागण्याची, बोलण्याची पध्दत तपासली गेली पाहिजे.त्याच्या स्वभावात होत जाणारे बदल जर वेळीच टिपल्या गेले नाही,तर मानवी भावभावना, सदाचार आणि कर्तव्य धर्म,व माणूसपणापासून अनेक तरूण खूप दुर निघून जातात. लक्षात येतं त्यावेळी वेळ निघून गेलेली असते.

अशाच छळवादातून आत्महत्येचे टोकाचे पाऊल एका मुलीला उचलावे लागले.जयपूरमधील एका नामांकित खाजगी शाळेतील नऊ वर्षाच्या एका चिमुरडीने शाळेतील मुलांच्या चिडवण्याच्या सततच्या त्रासापायी शाळा ईमारतीच्या चौथ्या माळ्यावरून उडी मारून आत्महत्त्या केली.परंतू ही शाळा राजकीय प्रस्थ आणि पैसाअसलेल्या बड्या मंडळीची असल्यामुळे पोलिसांनी लाचार होऊन आठ महिणे उलटल्यावरही शाळा व्यवस्थापन आणि मुलांवर कुठलीही कार्यवाही केली नाही.या खळबळजनक हृदयद्रावक घटनेने त्यांच्या खाकी वर्दीतील माणूस जीवंत झाला नाही. पालक आणि समाज संतप्त झाला,पण पोलिस स्थितप्रज्ञाप्रमाणे अजूनही शांत आहेत.पैसा आणि राजकीय वजनापुढे हुजरेगीरी करणारे आपल्याच समाजातल्या बालकांनाही न्याय देऊ शकत नाहीत.ही या लोकशाहीची फार मोठी शोकांतिका आहे.शाळेतील मुलं या मुलीला लैंगिक विषयावरून चिडवत होते,हे सी.सी.टी व्ही मधील डिजीटल पाट्यांवरून दिसत असल्याचे समजते. तिने आई- वडीलांना सांगीतले,प्राचार्य आणि शिक्षकांकडे तक्रारी करण्यात आल्यात.परंतू तरीही या प्रकरणाकडे लक्ष दिले गेले नाही.त्यामुळे भविष्यातील आनंदाची स्वप्ने पाहणाऱ्या एका मुलीला आपल्या आयुष्याचा शेवट करावा लागला.ती शाळेच्या चौथ्या मजल्यावर कशासाठी जाते,याकडेही शिक्षकांचे लक्ष नव्हते.या बेपर्वाहीमुळेच ४८ फुट उंचीवरून उडी मारून ती कायमची निघून गेली.याठीकाणी याच बेजबाबदार शिक्षकांची मुलगी असती, तर तिच्यासोबत होणाऱ्या क्रूर घटनांकडे यांनी दुर्लक्ष केले असते का?असा प्रश्न पालकवर्ग विचारत आहे.स्वतःला माणूस म्हणवणारे खाकी वर्दीतले निष्क्रीय पुतळे ढिम्म बसलेले आहेत.

चांगल्या विचारांच्या बालक तथा तरूणांवर जर क्रूर वागणुकीत आनंद मानणाऱ्या टारगट मुलांचे आक्रमण होत असते.ते याला तोंड देऊ शकत नसतील आणि सभ्य असतील,तर या अत्यंत अपमानास्पद आणि अन्यायकारक वागणुकीला कंटाळून त्यांचेवर मानसिक आघात होतात. अशी मुले मानसिक आजारांचे बळी ठरून औदासिन्न्यात जातात.सतत झालेल्या अपमानाचे बदले घेता आले नाहीत म्हणून ते मानसिक आक्रमक होऊन घरातच बडबड करून शिव्या पण देतात.तर कोणी अबोल होऊन कुटूंबापासून समाजापासून दुर राहतात. या परिस्थिमुळे मानसिक आजारात मोडणाऱ्या अनेक आजारापैकी एक सिझोफ्रोनिया असतो. प्रत्येकाची लक्षणे वेगवेगळी दिसतात.मानसिक आजारांच्या संकटात ढकलला गेलेला हा एक गट आहे.परंतू याचे यापेक्षाही भयानक टोक म्हणजे आत्महत्त्या....! काही जण वर्गमित्रांकडून होणारे अपमान सहन होत नसल्याने सद्विवेक हरवून मागचा पुढचा विचार न करता आत्महत्त्या करून स्वतःची आयुष्ये संपवतात.तरूणांना विनाशाच्या खाईत लोटणाऱ्या ह्या अत्यंत क्रूर आणि अमानुष घटना आहेत

तारूण्याच्या उंबरठ्यावर पाय ठेवणाऱ्या अनेक तरूणांसोबत अशा घटना घडत आहेत.स्वतःच संस्कारहिन असलेल्या काही बिघडलेल्या पालकांची टारगट मुले सदाचारी मुलांचे शाळांमधून सतत छळ करत असतात.त्यांचे ऐकले नाही तर तुला मुलींसमोर मारू अशाही धमक्या प्रसंगी देतात.मग या अन्यायग्रस्त मुलांचं भेदरलेल्या अवस्थेत नावापुरतं शाळेत जाणं असतं,वर्गात फक्त त्यांचं शरीर असतं.मन भयग्रस्त असतं.मग होमवर्क करणे नाही म्हणजे शिक्षकांचा दबाव,तो टाळण्यासाठी शाळेला दांडी मारली आणि कुठे तरी जाऊन बसला. मग शाळेतून फोन आला म्हणजे पालकांकडून शिक्षा.अशा परिस्थितीत वावरणारी अनेक मुलं मानसिक आजारांचे बळी ठरलेले आहेत.काहींनी आत्महत्त्या करून जीवन संपवलेली आहेत.याकडे अन्यायग्रस्त मुलांच्या पालकांनी वेळीच लक्ष दिले पाहिजे. आणि छळवादात आनंद माणणाऱ्या टारगट मुलांवरही त्यांच्या पालकांनी लक्ष ठेवले पाहिजे.प्रकरणे जास्तच पुढे गेलेली दिसत असतील तर शिक्षकांनी अशा विद्यार्थांवर कडक कारवाया केल्या पाहिजेत.ईतर मुलांची आयुष्य उध्वस्त होऊ नयेत हा विचाराला प्राधान्य दिले पाहिजे.त्यासाठी आपली माणुसकी आणि समाजधर्म जागवून अशा वाया गेलेल्या मुलांना शाळांमधून काढून त्यांच्या पालकांच्या स्वाधीन केलं पाहिजे.नाही तर अशा घटना घडत राहतील,अनेक अनर्थ होत राहतील. समाजातले तरुण संपत राहतील.म्हणून अशावेळी आपण वाचवावं कुणाला ह्यावर गुरूजणांनी चिंतन आवश्यक आहे. या काळात काय निर्णय घ्यावेत ह्या जबाबदाऱ्या प्रसंगावधान ठेऊन शिक्षकांनी कर्तव्य धर्माने पार पाडल्या पाहिजे....तरच अकाली जाणाऱ्या असंख्य युवकांचे प्राण वाचू शकतील..!

## मधमाशी पालनातून शेतकऱ्यांना सुवर्णसंधी; महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळातर्फे 'मधकेंद्र' योजनाचा लाभ घेण्याचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर:** दि,१५(जिमाका)-शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांचे उत्पन्न वाढवून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत संपूर्ण राज्यात 'मधकेंद्र' (मधमाशा पालन) योजना राबवित आहे. या योजनेद्वारे मधपाळांना प्रशिक्षण आणि अनुदानासह व्यवसायासाठी आवश्यक साहित्याचा पुरवठा केला जाणार आहे.इच्छूक उमेदवारांनी अधिक माहितीसाठी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, छत्रपती संभाजीनगर (ईएसआय हॉस्पिटलसमोर, चिकलठाणा औद्योगिक वसाहत) येथील कार्यालयाशी किंवा कार्यालयीन दूरध्वनी ०२४०-२३३४५६९ वर संपर्क साधावा. तसेच अधिक माहितीसाठी dviosambhajinagar@gmail.com या ईमेलवर किंवा मधुक्षेत्रीक शुभम राजेश सोनटक्के यांच्याशी ७६६६४४७३०७ या क्रमांकावर संपर्क साधावा.

मधमाशी पालनामुळे केवळ मध आणि मेणाची विक्री करून आर्थिक नफा मिळत नाही, तर मधमाश्यांच्या परागीकरणामुळे शेती पिकांच्या उत्पादनात ३० ते ४० टक्क्यांपर्यंत वाढ होते. अत्यंत कमी जागा आणि भांडवलात सुरू करता येणारा हा एक उत्तम पूरक व्यवसाय आहे.

या योजनेत ५० टक्के अनुदान आणि ५० टक्के लाभार्थी हिस्सा (स्व-गुंतवणूक) असे अर्थसाहाय्य दिले जाते. पात्र लाभार्थ्यांना मंडळाच्या माध्यमातून प्रशिक्षण १० दिवसांचे विनामूल्य निवासी प्रशिक्षण. दिले जाते.

महाबळेश्वर येथील मध संचालनालयात २० दिवसांचे प्रगत निवासी प्रशिक्षण. देखील दिले जाते.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार साक्षर आणि १८ वर्षांवरील असावा. प्रगतीशील मधपाळांसाठी किमान १० वी उत्तीर्ण आणि १ एकर शेतजमिनीची अट आहे. अर्जासोबत ओळखपत्र, शैक्षणिक दाखला, ७/१२ उतारा, बँक पासबुक आणि फोटो आवश्यक आहेत.

योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन खादी ग्रामोद्योग मंडळ, छत्रपती संभाजीनगर कार्यालयाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

## 'इंडिया स्किल्स स्पर्धेत' युवकांनी सहभागी होण्याचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर :** कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयोजित 'इंडिया स्किल्स कॉम्पिटिशन २०२६-२७'(India Skills Competition) चे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील पात्र युवक-युवतींनी मोठ्या संख्येने नोंदणी करून आपल्या कौशल्याला जागतिक व्यासपीठ मिळवून द्यावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त राजू वाकुडे यांनी केले आहे.

भारत सरकारच्या 'नॅशनल स्किल डेव्हलपमेंट काऊन्सिल'च्या (NSDC) मार्गदर्शनाखाली होणारी ही देशातील सर्वात प्रतिष्ठित कौशल्य स्पर्धा आहे. या स्पर्धेतून निवडलेले तरुण जिल्हा, विभाग, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहेत. राष्ट्रीय स्तरावरील विजेत्यांना थेट जागतिक स्तरावरील 'वर्ल्ड स्किल्स कॉम्पिटिशन' (World Skills Competition) मध्ये सहभागी होण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी उमेदवार भारतीय नागरिक असणे अनिवार्य आहे.

सामान्य कौशल्य प्रकार ५६ असून उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००३ किंवा त्यानंतरचा असावा.टीम कौशल्य प्रकार मध्ये (रोबोटिक्स, कन्स्ट्रक्शन इ. मध्ये सहभागी होणाऱ्या उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००६ किंवा त्यानंतर असावा. यात ऑटोनॉमस मोबाईल रोबोटिक्स

मेकॅट्रोनिक्स, रोबोटिक्स सिस्टिम्स इंटिग्रेशन लँडस्केप गार्डनिंग याचा समावेश आहे.

इच्छुक उमेदवारांनी अर्ज अधिकृत संकेतस्थळ www.skillindiadigital.gov.in वर जाऊन 'User Manual' आणि 'List of Skills' यांचा अभ्यास करावा. आयटीआय (ITI), अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिकेतन, विविध कौशल्य प्रशिक्षण संस्था आणि उद्योगांमधील कुशल तरुणांनी या स्पर्धेत सहभागी होऊन जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करावे. या स्पर्धेबाबत अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मालजीपुरा, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा ९४०४६७४८५९ या व्हॉट्सॲप क्रमांकावर संदेश पाठवावा, सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, मार्गदर्शन केंद्र यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे.

## आरोग्य सेवा अधिक परिणामकारक, गुणवत्तापूर्ण व लोकाभिमुख करा-आयुक्त संजय काटकर

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी:** राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे अभियान संचालक तथा आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर यांनी विभाग जिल्ह्याच्या दौऱ्यादरम्यान छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी आणि हिंगोली या चार जिल्ह्यांतील विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांचा सविस्तर आढावा घेत आरोग्य अधिकाऱ्यांना सेवा अधिक परिणामकारक, गुणवत्तापूर्ण आणि लोकाभिमुख करण्याचे निर्देश दिले. जिल्हा परिषदेच्या सभागृहात झालेल्या या आढावा बैठकीस अतिरिक्त संचालक डॉ. संदीप सांगळे, उपसंचालक डॉ. राधाकृष्ण पवार, चारही जिल्ह्यांचे जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा क्षयरोग अधिकारी, जिल्हा हिवताप अधिकारी, राज्य कार्यक्रम व्यवस्थापक, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, जिल्हा लेखा व्यवस्थापक तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (आरबीएसके) अंतर्गत कार्यरत पथकांच्या कामकाजाचा सखोल आढावा घेण्यात आला. शाळा व अंगणवाड्यांमधील सर्व बालकांची आरोग्य तपासणी 31 ऑगस्ट 2026 पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश आयुक्त संजय काटकर यांनी दिले.

## शेतकऱ्यांना उच्च दर्जाचे बियाणे मिळण्यासाठी सर्वसमावेशक धोरण तयार करणार : कृषिमंत्री

**मुंबई, दि. १५ :** राज्यातील शेतकऱ्यांना उच्च दर्जाचे बियाणे उपलब्ध व्हावे, निकृष्ट अथवा बनावट बियाण्यांमुळे त्यांचे नुकसान होऊ नये आणि बियाणे उत्पादन, साठवणूक, तपासणी व विक्री प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्व निर्माण व्हावे, यासाठी सर्व संबंधितांच्या सूचनांचा विचार करून राज्य शासन सर्वसमावेशक धोरण तयार करणार असल्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.



मंत्रालयात बियाणे तपासणीच्या उत्तरदायित्वाच्या कार्यपद्धतीत (SOP) बदल करून नवीन मानक कार्यपद्धती निश्चित करण्याबाबत आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीस दूरदृश्यप्रणालीव्दारे राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, आमदार भास्कर जाधव, कैलास घाडगे पाटील, हेमंत ओगले, हरीश पिंपळे, सुमित वानखेडे, रणधीर सावरकर, समीर कुणावार, राजेश बकाने, सई प्रकाश डहाके, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, कृषी आयुक्त सूरज मांढरे, महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. दिलीप स्वामी, कृषी संचालक सुनिल बोरकर, उपसचिव संतोष कराड उपस्थित होते.

कृषिमंत्री भरणे म्हणाले की, बियाण्यांच्या गुणवत्तेबाबत उत्तरदायित्व निश्चित करणे, शेतकऱ्यांचा विश्वास वाढविणे आणि बियाणा व्यवस्थेतील प्रत्येक टप्पा अधिक सक्षम करणे हे शासनाचे उद्दिष्ट आहे. यासाठी साथी पोर्टलचा प्रभावी वापर, क्यू आर कोडद्वारे बियाण्यांचा मागोवा, स्रोत बियाण्याची पडताळणी, खासगी प्रक्रिया केंद्रांची नोंदणी, सरकारी प्रयोगशाळांमध्ये नमुने जमा करणे, नमुने लवकरात लवकर तपासण्यावर भर, ई-लॅब आणि कोड प्रणालीद्वारे पारदर्शक तपासणी, ग्रो आउट टेस्ट सारख्या आधुनिक पद्धतींचा वापर, तसेच परराज्यातून येणाऱ्या बियाण्यांवर विशेष तपासणी यासारख्या उपाययोजनांचा नव्या धोरणात समावेश करण्यात येणार आहे.

कृषी मंत्री म्हणाले की, शेतकऱ्यांच्या बियाणेविषयक तक्रारींवर तातडीने कार्यवाही, तपासणी प्रक्रियेत पारदर्शकता, गुणवत्ता नियंत्रण अधिक प्रभावी करणे आणि निकृष्ट बियाण्यांमुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक त्या कायदेशीर आणि प्रशासकीय उपाययोजनांचा नव्या धोरणात समावेश करण्यात येईल. शेतकरी हिताला सर्वोच्च प्राधान्य देत सर्व संबंधितांच्या सूचना व शिफारशींचा अभ्यास करून अंतिम धोरण तयार करण्यात येईल. समिती सदस्यांनी दिलेल्या अभिप्रेयांचा नवीन धोरणामध्ये समावेश केला जाईल असेही ते म्हणाले.

## वर्षभराची प्रतीक्षा संपली, उद्या निघणार भगवान जगन्नाथांची भव्य रथयात्रा ..!

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :**भगवान श्री जगन्नाथ, बंधू बलभद्र आणि भगिनी सुभद्रा यांच्या पवित्र उपस्थितीत निघणाऱ्या भव्य रथयात्रा महोत्सवाचे उद्या परभणी शहरात उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले आहे. हरिनामाचा अखंड गजर, टाळ-मृदुंगाचा मंगल नाद, भगव्या पताकांनी सजलेला मार्ग आणि हजारो भाविकांच्या उत्स्फूर्त सहभागाने हा भक्तिमय सोहळा अविस्मरणीय ठरणार आहे. चला, या दिव्य रथयात्रेचे साक्षीदार होऊया, प्रभू श्री जगन्नाथांचे दर्शन घेऊन त्यांचे मंगल आशीर्वाद प्राप्त करूया आणि आपल्या कुटुंबीय व मित्रांसह या पवित्र उत्सवात सहभागी होऊया. ही रथ यात्रा दि 16जुलै रोजी दुपारी ठीक 2वाजता शनिवार बाजार येथून ही रथ यात्रा आरभ होईल तरी सर्व भाविक भक्तांनी या रथ यात्रेत सहभागी होऊन या रथ यात्रेचीशोभा वाढवावी असे अहवान संयोजक कडून करण्यात आले

## मृगबहार 2026 फळ पीक विमा योजनेत परभणी जिल्हा द्वितीय क्रमांकावर

### राज्यात आतापर्यंत 81,523 शेतकऱ्यांचा सहभाग

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी,** : पुनर्रचित हवामान आधारित फळ पीक विमा योजनेअंतर्गत मृगबहार 2026 हंगामासाठी शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून, आतापर्यंत तब्बल 81 हजार 523 विमा अर्जांची नोंदणी झाली आहे. या योजनेत सहभागी होणारा परभणी जिल्हा हा राज्यात द्वितीय क्रमांकावर असून, जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी विमा काढून पीक संरक्षित करण्याचे आवाहन कृषि विभागाकडून करण्यात आले आहे.

गतवर्षी मृगबहार 2025 मध्ये केवळ 52 हजार 121 अर्ज प्राप्त झाले होते. यंदा त्यात 29 हजार402 अर्जांची वाढ झाली असून, मागील वर्षाच्या तुलनेत नोंदणीचे प्रमाण सुमारे 156 टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. 27 जून 2026 रोजीच्या शासन निर्णयानुसार या योजनेची अंमलबजावणी सुरू करण्यात आली. यंदा पारंपरिक द्राक्ष, पेरू, लिंबू, सीताफळ, मोसंबी, संत्रा, डाळिंब आणि चिकू या पिकांसोबत अंजीर आणि हळद या दोन नवीन पिकांचा प्रथमच समावेश करण्यात आला आहे.

योजनेअंतर्गत द्राक्षासाठी 3.80 लाख, हळदीसाठी 1.80 लाख, डाळिंब व अंजीरसाठी प्रत्येकी 1.60 लाख रुपये, तर मोसंबी व संत्र्यासाठी प्रत्येकी 1 लाख रुपये प्रति हेक्टर विमा संरक्षित रक्कम निश्चित करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना साधारण 5 टक्के विमा हप्ता भरावा लागतो. नोंदणीच्या आकडेवारीनुसार हळद पिकासाठी सर्वाधिक 41,595 विमा अर्ज प्राप्त झाले असून, त्याखालोखाल संत्रा 10,237 आणि डाळिंब 8,063 अर्जांची नोंद झाली आहे.

जिल्हानिहाय सहभागात नांदेड जिल्हा 13,875 अर्जांसह प्रथम क्रमांकावर असून, त्यानंतर परभणी (12,162), हिंगोली (11,910) आणि अहिल्यानगर (11,035) या जिल्ह्यांचा क्रमांक लागतो. विशेषतः हळद पिकाचा योजनेत समावेश झाल्यामुळे परभणी, नांदेड आणि हिंगोली जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदविला आहे. अंजीर आणि सीताफळ या पिकांसाठी विमा अर्ज करण्याची अंतिम मुदत 31 जुलै 2026 असून, इतर सर्व पिकांसाठी अर्ज प्रक्रिया 14 जुलै 2026 रोजी पूर्ण झाली आहे. तसेच बँकांमार्फत सादर होणाऱ्या अर्जांमुळे अंतिम नोंदणीत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. योजनेतील सर्व अर्ज एनसीपीआय ऑनलाइन पोर्टलद्वारे स्वीकारले जात असून, विमा घेतलेल्या सर्व शेतकऱ्यांनी डिजिटल पीक पाहणी वेळेत पूर्ण करणे आवश्यक आहे. अन्यथा विमा अर्ज अपात्र ठरू शकतो, असा इशारा प्रशासनाने दिला आहे. दरम्यान, अंजीर व सीताफळ उत्पादक शेतकऱ्यांनी उपलब्ध मुदतीत योजनेचा अभ्यास करून विमा संरक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

## संस्कृत केवळ भाषा नसून संपन्न संस्कृतीचा पाया : निवेदिता सराफ

### साहित्य भारती आणि संस्कृत प्रतिष्ठानमतर्फे संस्कृत शिक्षकांचा सत्कार

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी :** संस्कृत ही केवळ एक भाषा नसून, ती आपल्या संपन्न संस्कृतीचा पाया आहे. महाकवी कालिदास यांचे साहित्य मानवी भावनांचे आणि निसर्गाचे अप्रतिम प्रकटीकरण करते, असे विचार संस्कृत अभ्यासक डॉ. निवेदिता सराफ यांनी मंगळवारी, १४ रोजी व्यक्त केले.



साहित्य भारती आणि संस्कृत प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने कालिदास दिनाचे औचित्य साधून सराफ यांचे व्याख्यान आणि संस्कृत शिक्षकांचा सत्कार सोहळा जीवन विकास ग्रंथालयात झाला. यावेळी बोलताना सराफ यांनी महाकवी कालिदास यांच्या साहित्यातील अजरामर पैलूंवर प्रकाश टाकला. या वेळी व्यासपीठावर संस्कृत प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. अजय निलंगेकर, साहित्य भारतीचे जिल्हाध्यक्ष प्रा. विजय पोहनेरकर, कार्याध्यक्ष प्रा. डॉ. महेश खरात यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी गिरीश जोशी यांनी मेघदूत या रचनेला काव्यात्मक पद्धतीने सादरीकरण केले. सारिका कुलकर्णी यांनी सरस्वती स्तवन म्हटले. कलारंगचा आयुष मस्के याने संस्कृत गौरवगीत सादर केले. या कार्यक्रमात संस्कृत शिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

डॉ. खरात यांची सोलापूरच्या अहिल्यादेवी होळकर विद्यापीठात अधिष्ठाता म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांनाही सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचालन दीपाली कुलकर्णी यांनी, तर आभार गिरीश जोशी यांनी मानले.

## पिसादेवी रस्त्यावरील अपघाती मृत्यूनंतर नागरिकांचा रस्ता रोको

पान 1 वरून ->

मेव्हणे दीपक विश्वनाथ इंगळे (रा. एन ६, सिंहगड कॉलनी) यांनी फिर्याद दिली आहे. ट्रॅक्टर चालकाने आपले वाहन भरधाव वेगाने चालवून रवींद्र यांच्या दुचाकीला मागून धडक दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे. दरम्यान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापासून मिसारवाडीच्या पुढे पिसादेवीपर्यंतचा हा सिमेंट रस्ता अत्यंत असुरक्षित व निकृष्ट दर्जाचा बनवला गेला आहे. रस्त्याला मधोमध पडलेल्या मोठ्या भेगा आणि दोन्ही बाजूंना असलेला धोकादायक उतार यामुळे दुचाकी नेहमी घसरतात. ओव्हरटेक करताना या भेगांमुळे अपघात होऊन आतापर्यंत अनेकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत, असा तीव्र संताप स्थानिक नागरिकांनी व्यक्त केला आहे.

ट्रॅक्टरच्या चाकाखाली येऊन जागीच मृत्यू

मूळचे जळगाव जिल्ह्यातील भडगावचे रहिवासी असलेले रवींद्र बाजीराव पाटील (वय ५० वर्षे, सध्या रा. जयहिंदनगरी, पिसादेवी) हे येथील 'अलंकार टुल' या खाजगी कंपनीत नोकरी करत होते. मंगळवारी रात्री ९ वाजताच्या सुमारास ते आपल्या दुचाकीवरून किराणा सामान घेऊन घरी परतत होते. माऊली सुपर मार्केट आणि जयहिंदनगरीजवळ रस्त्यावरील मोठ्या भेगेत त्यांची दुचाकी आदळली आणि ते नियंत्रण सुटून थेट शेजारून जाणाऱ्या ट्रॅक्टरच्या चाकाखाली आले. या भीषण अपघातात त्यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. रवींद्र पाटील यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली आणि डिप्लोमाच्या अंतिम वर्षात शिकणारा एक मुलगा असा परिवार आहे. एका मुलीचे लग्न झाले आहे. या अपघाताच्या वृत्ताने संपूर्ण पिसादेवी आणि जयहिंदनगर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# संविधानीक न्याय हक्क महामोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हा

**अजींठा प्रतिनिधी :** मा.सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला १ ऑगस्ट २०२४ रोजी अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण करण्यासंदर्भात निर्णय घेण्याचे आदेश दिलेले आहेत.



माजी न्यायमूर्ती बदर समितीने सुद्धा याबाबतचा अहवाल महाराष्ट्र सरकारला दिलेला आहे त्या अनुषंगाने अनुसूचित जाती आरक्षणचे उपवर्गीकरण अ ब क ड याप्रमाणे करण्यात यावे या मागणीसाठी दि १६ जुलै गुरुवार रोजी सकल मातंग समाज तसेच आरक्षण उपवर्गीकरण समर्थन कृती समिती यांच्या वतीने संविधानीक न्याय हक्क महामोर्चाचे आयोजन करण्यात आलेले आहे .

सदरील मोर्चात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे नातु तथा ए बी एस क्रांती सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सचिन भाऊ साठे उपस्थित राहणार असुन ते मोर्चाला संबोधित करणार आहेत.

सिल्लोड शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक ते तहसिल कार्यालय पर्यत पायी मोर्चा निघणार असुन लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक ( तहसिल कार्यालय) येथे सभेच्या कार्यक्रमानंतर तहसिलदार साहेब यांच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांना निवेदन देऊन मोर्चाची सांगता होणार आहे तरी अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण समर्थनार्थ संविधानीक न्याय हक्क महामोर्चात मातंग समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन लहुजी क्रांती सेनेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अशोकराव कांबळे, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष सखाराम आहीरे, सामाजिक कार्यकर्ते साहेबराव सोनवणे ,सामाजिक कार्यकर्ते विष्णू सोनवणे,महाराष्ट्र प्रदेश सचिव कैलास पाजगे, प्रदेश कार्याध्यक्ष नामदेव खेत्रे,प्रदेश कोषाध्यक्ष सोमिनाथ भालेराव, मराठवाडा अध्यक्ष नानासाहेब गायकवाड, जिल्हाध्यक्ष साहेबराव अहिरे, जिल्हा उपाध्यक्ष सुखदेव कांबळे ,जिल्हा सचिव बाबुराव अहिरे ,तालुका अध्यक्ष संजय कांबळे यांच्या वतीने करण्यात आलेले आहे.

# जालना शहराच्या विकासासाठी प्रशासनाने तातडीने कामाला लागावे : भास्कर आबा दानवे

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**जालना :** जालना महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत प्रभाग क्रमांक १ चे नगरसेवक भास्कर आबा दानवे यांनी शहरातील विविध जनहिताच्या प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेत प्रशासनाला तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. दानवे यांनी दत्तनगर, गायत्रीनगर व कोठारीनगर परिसरात मुसळधार पावसामुळे पाणी साचून घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांचे मोठे नुकसान झाल्याचा मुद्दा उपस्थित केला. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा म्हणून पावसाच्या पाण्याचा नैसर्गिक प्रवाह योग्य नियोजनातून सीना नदीकडे वळविण्याची मागणी त्यांनी केली.

शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन सफाई कर्मचाऱ्यांची संख्या वाढवावी, प्रमुख २५ चौकांचे सुशोभीकरण करताना संत शिरोमणी रविदास महाराज यांच्या नावाने चौक विकसित करावा, तसेच रस्त्यांच्या मधोमध असलेले विद्युत खांब हटवून वाहतूक सुरक्षित करावी, अशी मागणीही त्यांनी केली. शहरातील युवक-युवती व खेळाडूंसाठी आधुनिक सुविधांनी सुसज्ज दर्जेदार क्रीडा स्टेडियम उभारण्याची गरजही त्यांनी सभागृहात अधोरेखित केली.

# जिल्ह्यात चोरीच्या श्रंखला वाढल्याने संशयितांची धरपकड सुरू

## परभणी जिल्हा जिल्ह्यात पोलिसांची कारवाई

हिंदू प्रकाश वार्ता / प्रतिनिधी

**परभणी:** मागील काही दिवसां पासून रात्री व दिवसा चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली असून त्यामध्ये शेत आखाड्यावरील साहित्य बंद असलेले घरे यांच्यावर चोरट्याने लक्ष केंद्रित करून चोरी करण्याचा सपाटा लावला होता परभणी पोलिसांनी विशेष मोहीम राबवत संशयीताना ताब्यात घेतले आहे तर अंधारात फायदा घेत दब्बा धरून बसलेल्या संशयीताना पकडण्यात आले असून त्यांच्यावर विविध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यापैकी जिंतूर तालुक्यातील बामणी पोलीस ठाण्यात नितीन रुस्तुम चव्हाण चारठाणा पोलीस ठाण्यात प्रदीप प्रभाकर घुगे नागोराव दासू मोहिते गंगाखेड पोलीस ठाण्यात नितीन शिवाजीराव साळवे सचिन संतोष जगताप जिंतूर पोलीस ठाण्यात पवन आश्रुवा वाकळे माऊली अंबादास नागरे मानवत पोलीस ठाण्यात भैयासाहेब सर्जेराव तूप समुद्रे नवा मुंडा पोलीस ठाण्यात मोहम्मद रेहान मोहम्मद इरफान नाना पेठ पोलीस ठाण्यात सोनू कैलास कांबळे पात्री पोलीस ठाण्यात मोहम्मद बिन पारस अबुत हातोश मनोहर सर्वर कुरेशी शेख जलील शेख शादुल्ला मोहम्मद आजी मोहम्मद रियाजुद्दीन शेलू पोलीस ठाण्यात संभाजी बाबासाहेब भांबट दत्ता कुंडलिक भांबट श्रीकांत मुंजा हेडवे गणेश बाबासाहेब मुळे अभिजीत दीपक लिपणे यांच्यावर गुन्हा नोंदविण्यात आला असून सदर व्यक्ती संशयित्या अंधाराचा फायदा घेत आपले अस्तित्व लपून बसलेले मिळून आले त्यांची चौकशी केली असता त्यांच्याकडून योग्य समाधानकारक उत्तर न दिल्याने गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# खरीप 2026 साठी क्रिस्टल क्रॉप प्रोटेक्शनच्या सहा अत्याधुनिक कृषी नवकल्पना

मुंबई : खरीप हंगामातील बदलते हवामान, कीड-रोगांचा वाढता प्रादुर्भाव आणि उत्पादनवाढीची गरज लक्षात घेऊन क्रिस्टल क्रॉप प्रोटेक्शन लिमिटेडने खरीप २०२६ साठी सहा अत्याधुनिक कृषी उत्पादने सादर केली आहेत. सोयाबीन, मका, भात आणि कापूस या प्रमुख पिकांसाठी विकसित करण्यात आलेली ही उत्पादने शेतकऱ्यांचे उत्पादन, गुणवत्ता आणि नफा वाढविण्यास मदत करतील, असा कंपनीचा दावा आहे.

सोयाबीनसाठी पेटंट तंत्रज्ञानावर आधारित 'सामोरियन' आणि मक्यासाठी 'टाकुरो' ही तणनाशके सादर करण्यात आली असून ती गवत व रुंद पानांच्या तणांवर प्रभावी नियंत्रण ठेवतात. भात पिकासाठी 'झेबेरिया' आणि 'मॅक्सेंट्रा' ही बुरशीनाशके विकसित करण्यात आली असून ती बुरशीजन्य व जिवाणूजन्य रोगांवर नियंत्रण ठेवून पिकाची गुणवत्ता सुधारतात. कापसासाठी स्मार्ट ट्रिपल ॲक्शन तंत्रज्ञानावर आधारित 'वाल्टुवा' हे कीटकनाशक रसशोषक किडींवर प्रभावी संरक्षण देते. तसेच GreenAg तंत्रज्ञानावर आधारित 'KGR-T' हे सेंद्रिय पोषण उत्पादन फुले, फळधारणा आणि पिकाची वाढ सुधारण्यास उपयुक्त ठरणार आहे.

कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक अंकुर अग्रवाल यांनी सांगितले की, शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष गरजा लक्षात घेऊन परवडणारे आणि परिणामकारक उपाय विकसित करण्यावर कंपनीचा भर आहे. व्यापक क्षेत्रीय पडताळणीनंतर ही उत्पादने बाजारात आणण्यात आली असून शाश्वत शेती आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानाद्वारे भारतीय शेतकऱ्यांना सक्षम करण्याची कंपनीची वचनबद्धता कायम राहणार असल्याचे कंपनीने स्पष्ट केले.

# जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त 86 आरोग्य योद्ध्यांचा जिल्हा परिषदेकडून गौरव

## लोकसंख्या स्थिरीकरण, बालविवाह प्रतिबंध आणि कुपोषणमुक्त जिल्ह्यासाठी समन्वित प्रयत्नांचे आवाहन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगरच्या वतीने कुटुंब कल्याण कार्यक्रमात सन २०२५-२६ मध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ७४ अधिकारी, कर्मचारी व आरोग्य संस्थांसह 'फ्लॉरेन्स नाईटिंगेल' पुरस्कारप्राप्त १२ परिचारिकांचा वेरूळ सभागृहात गौरव करण्यात आला. लोकसंख्या स्थिरीकरण, बालविवाह प्रतिबंध आणि कुपोषणमुक्त जिल्हा घडविण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी.एम. (भा. प्र.से.), आरोग्य व शिक्षण समितीच्या सभापती अनिताताई मोठे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कमलाकर मुदखेडकर, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. छाया आवरगांवकर, सहायक जिल्हा



आरोग्य अधिकारी डॉ. शैलेजा कृप्पास्वामी, साथरोग वैद्यकीय अधिकारी डॉ. सारिका लांडगे व निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत बढे यांच्यासह आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

प्रास्ताविकात डॉ. अभय धानोरकर यांनी जिल्ह्यातील कुटुंब कल्याण कार्यक्रमाचा आढावा सादर केला. मार्गदर्शन करताना मित्रू पी.एम. यांनी वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर लोकसंख्या स्थिरीकरण ही सामूहिक जबाबदारी असल्याचे सांगत कुटुंब कल्याण कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याचे आवाहन केले. तसेच १७ सप्टेंबर २०२६ पर्यंत छत्रपती संभाजीनगर जिल्हा कुपोषणमुक्त करण्यासाठी सर्व यंत्रणांनी एकत्रितपणे काम करण्याच्या सूचना दिल्या.

अध्यक्षीय समारोपात अविनाश गलांडे यांनी ग्रामीण भागातील वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका आणि अंगणवाडी सेविकांच्या सेवाभावाचे कौतुक करत शासनाच्या आरोग्य योजनांचा लाभ शेवटच्या नागरिकापर्यंत पोहोचविण्यात त्यांचे योगदान मोलाचे असल्याचे सांगितले.

यावेळी कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया, पुरुष नसबंदी, पीपीआययूसीडी सेवा, उत्कृष्ट प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालये, आशा स्वयंसेविका तसेच प्रोत्साहनपर कार्य करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना गौरवचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. समारोपावेळी डॉ. छाया आवरगांवकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी बी. एस. थोरात, गुलबस सांगळे, रामेश्वर मूळे, आर. एम. शेख, शारदा कांबळे, अर्चना भारती, नरेंद्र बावनथडे, चंदन गणोरे, कैलास भूमरे आणि लतीफ यांनी विशेष परिश्रम घेतले.

# जि. प. सदस्या पुष्पाताई काळे यांच्या पुढाकारातून 'सोयगाव पर्यटन विकास प्रस्ताव' सादर;पर्यटन उपसंचालकांकडून पायाभूत सुविधांचे आश्वासन

हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी

**सोयगाव,दि.१५ जुलै :** सातमाळा डोंगररांगेतील समृद्ध ऐतिहासिक आणि नैसर्गिक वारशाचा विकास करून सोयगाव तालुक्याच्या स्थानिक पर्यटनाला गती देण्यासाठी जिल्हापरिषद सदस्या पुष्पाताई प्रकाश काळे यांच्या विशेष पुढाकारातून आणि मार्गदर्शनाखाली पर्यटन संचालनालय कार्यालयात एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.या बैठकीत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ट्रेकर्स आणि टूर ऑपरेटर्सच्या वतीने 'सोयगाव पर्यटन विकास प्रस्ताव' अधिकृतपणे सादर करण्यात आला.पुष्पाताई प्रकाश काळे यांच्या नेतृत्वाखाली तेजस्विनी



काळे यांनी सादर करण्यात आलेल्या या प्रस्तावामध्ये सोयगाव परिसरातील प्रमुख १४ पर्यटन स्थळांच्या सर्वांगीण विकासाची मागणी करण्यात आली आहे.यामध्ये प्रामुख्याने वेताळवाडी,वसई, सुटोंड/नायगाव, अंतूर, नायगाव आणि जंजाळा या ५ ऐतिहासिक किल्ल्यांचा समावेश आहे.यासोबतच प्रसिद्ध घटोत्कच रुद्रेश्वर लेणी,मंदिर धबधबा,मनुदेवी मंदिर व धबधबा आणि काळदरी गाव भ्रमंती (व्हिलेज टूरिझम) या पर्यटन घटकांवर बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. या प्रसंगी पर्यटन विभागाचे प्रादेशिक उपसंचालक विजय जाधव यांनी या प्रस्तावाचे अत्यंत सकारात्मक स्वागत केले. पुष्पाताई काळे यांनी मांडलेल्या मागण्यांची दखल घेत, सोयगाव परिसरातील गड-किल्ले,लेणी आणि निसर्गरम्य ठिकाणांवर पर्यटकांसाठी आवश्यक त्या मूलभूत पायाभूत सुविधा (Infrastructure) प्राधान्याने उभारून दिल्या जातील, असे ठोस आश्वासन त्यांनी दिले.या महत्त्वपूर्ण बैठकीला छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील नामांकित ट्रेकर्स, दुर्गप्रेमी आणि टूर ऑपरेटर मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुष्पाताई प्रकाश काळे यांच्या या महत्त्वपूर्ण पुढाकारामुळे सोयगाव पर्यटन विकासाला मोठी गती मिळणार असून, ग्रामीण भागात रोजगार निर्मितीसाठी हा प्रकल्प मैलाचा दगड ठरेल,असा विश्वास उपस्थित सर्वांनी व्यक्त केला. याप्रसंगी उपस्थित सर्व टूर ऑपरेटर्सनी देखील या पर्यटन विकासाच्या कार्यात आणि नियोजनात पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

# गोळेगाव सेवा केंद्राच्या वतीने 2 हजार वृक्षांची लागवड; पर्यावरण संवर्धनाचा संदेश



**अजींठा प्रतिनिधी :** जगद्गुरु रामानंदाचार्यजी नरेंद्राचार्यजी महाराज तथा परमपूज्य कानिफनाथ महाराज यांच्या शुभ आशीर्वादाने गोळेगाव सेवा केंद्राच्या वतीने रविवारी दि. १२ जुलै भव्य वृक्षलागवड अभियान उत्साहात पार पडले पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत या अभियानात विविध प्रकारची सुमारे दोन हजार झाडे लावण्यात आली या अभियानाची सुरुवात गोळेगाव खुर्द येथील खोलेश्वर महादेव मंदिर परिसरातून करण्यात आली प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षणाची सामूहिक शपथ घेण्यात आली वाढते प्रदूषण हवामानातील बदल आणि निसर्ग संवर्धनाची गरज लक्षात घेऊन प्रत्येकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले

या प्रसंगी गोळेगाव खुर्दचे सरपंच गणेश बनकर सुरेश गव्हाणे गजानन बनकर, अरविंद मुरकुटे अमोल पाटील झोंड नितीन पाटील झोंड यांच्यासह ग्रामस्थ सेवेकरी आणि महिला वर्ग युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते गोळेगाव शाळा केंद्राच्या वतीनेही या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविण्यात आला

अभियानात लावण्यात आलेल्या प्रत्येक रोपाचे संगोपन करण्याची जबाबदारीही स्वयंसेवकांनी स्वीकारली वृक्षलागवड ही केवळ एक दिवसाची मोहीम नसून भविष्यातील पिढ्यांसाठी हिरवेगार आणि प्रदूषणमुक्त वातावरण निर्माण करण्याचा हा संकल्प असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# साहेब प्रतिष्ठानतर्फे सासवड येथे संत ज्ञानेश्वर माऊली पालखीतील वारकऱ्यांना स्नेहभोजन

## दिंडी क्रमांक एकमधील वारकऱ्यांचा उपरणे व पांढरी टोपी देऊन सन्मान; भक्तीभावातून समाजसेवेचा उपक्रम

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**सासवड :** संत ज्ञानेश्वर माऊलींची पालखी सासवड येथे मुक्कामी असताना दिंडी क्रमांक एकमधील वारकरी बांधवांसाठी साहेब प्रतिष्ठानतर्फे मिष्टान्नासह स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी वारकरी बांधवांचा उपरणे व पांढरी टोपी देऊन सन्मान करण्यात आला.



आषाढी वारी ही महाराष्ट्राच्या भक्तीपरंपरेतील श्रद्धा, समर्पण आणि सेवाभावाचा उत्सव मानली जाते. वर्षभर कष्ट करून जगाला अन्न पुरवणारा शेतकरी विठ्ठलनामाचा गजर करीत पंढरीची वाट धरतो. अशा वारकरी आणि शेतकरी बांधवांना प्रेमाने दोन घास वाढण्याचे पुण्यकर्म साहेब प्रतिष्ठानने या उपक्रमातून जपले. यावेळी प्रतिष्ठानचे सदस्य प्रशांत अप्पा हूरणे यांनी वारकरी बांधवांचा उपरणे व पांढरी टोपी देऊन सत्कार केला. भजन, कीर्तन, भारूड, फुगड्या आणि विठ्ठलनामाच्या गजरात पार पडलेल्या या उपक्रमामुळे परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला. वारकरी बांधवांशी साधलेला काही तासांचा सहवास वर्षभर प्रेरणा देणारा ठरल्याची भावना प्रतिष्ठानच्या सदस्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशाल घुगे, संतोष चांदरे, किशोर उपाध्याय, अविनाश नलावडे, भाऊसाहेब मोरे, मंगेश शेजुळ, ज्ञानेश्वर निकम, दिनेश तिवारी यांच्यासह साहेब प्रतिष्ठानच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

# तांत्रिक अडचणींमुळे 'लाडकी बहीण' योजनेपासून कोणीही वंचित राहू नये : विजय म्हस्के

**अजिंठा प्रतिनिधी :** तांत्रिक अडचणींमुळे 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या लाभापासून वंचित राहिलेल्या महिलांसाठी के.वाय. सी.(KYC) प्रक्रिया पूर्ण करण्यास मुदतवाढ द्यावी व विशेष शिबिरे आयोजित करावीत,अशी आग्रही मागणी केंद्रीय ग्राहक संरक्षण समितीचे जिल्हाध्यक्ष विजय म्हस्के पाटील यांनी केली आहे.यासंदर्भात त्यांनी महिला व बालविकास मंत्री आदितीताई तटकरे यांना ईमेलद्वारे पत्र पाठवले. सिल्लोड तालुक्यासह राज्यातील ग्रामीण व दुर्गम भागात इंटरनेटची संथ गती,बँक खात्याशी आधार लिंक नसणे आणि बायोमॅट्रिक मशीनवर अंगठ्याचे ठसे न जुळणे (Biometric issues) यांमुळे हजारो पात्र महिलांना अद्याप लाभ मिळालेला नाही. या संवेदनशील विषयाची दखल घेऊन मंत्री आदिती तटकरे यांनी स्थानिक प्रशासन व बँकांना तात्काळ विशेष कॅम्प (शिबिरे) घेण्याचे निर्देश द्यावेत,जेणेकरून राज्यातील एकही पात्र भगिनी या लाभापासून वंचित राहणार नाही,अशी विनंती म्हस्के पाटील यांनी पत्रात केली आहे.




# श्री गोडीजी पार्श्वनाथ जिनालयात भव्य चातुर्मास प्रवेश सोहळा उत्साहात

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** श्री आनंदजी कल्याणजी जैन श्वेतांबर मंदिर ट्रस्ट, जोहरीवाडा यांच्या वतीने श्री गोडीजी पार्श्वनाथ जिनालयात पूज्य साध्वी भगवंतांच्या चातुर्मास प्रवेशानिमित्त भव्य शोभायात्रा आणि धार्मिक कार्यक्रम उत्साहात पार पडले. या सोहळ्यात मोठ्या संख्येने जैन समाजातील श्रावक-श्राविका सहभागी झाले होते.



शोभायात्रेची सुरुवात श्री विमलनाथ मंदिरातून झाली. संस्थान गणपती, पानदरीबा, मच्छली खडक आणि गुलमंडी मार्गे ती श्री गोडीजी पार्श्वनाथ जिनालयात पोहोचली. मार्गभर जैन धर्माच्या घोषणांनी वातावरण भक्तिमय झाले होते. महिलांनी मंगल कलश डोक्यावर धारण करून पारंपरिक वेशभूषेत सहभाग नोंदविला.

या चातुर्मासासाठी पू. सा. अर्केंदुश्रीजी म.सा., विदुषी पू. सा. राजप्रज्ञाश्रीजी म.सा., पू. सा. कोटिगुणाश्रीजी म.सा. आणि पू. सा. भव्यरत्नाश्रीजी म.सा. यांचे मंगल आगमन झाले. तसेच परमपूज्य ग.आ.भ. श्रीमद् विजय अभयदेवसूरिश्वरजी महाराजा व परमपूज्य आ.भ. श्रीमद् मोक्षरत्नसूरिश्वरजी म.सा. यांचे आशीर्वाद लाभले.

जिनालयात मांगलिक, धर्मप्रवचन व नवकारशीचे आयोजन करण्यात आले. चातुर्मासात धर्मआराधना, तप, स्वाध्याय आणि संयमाचे पालन करण्याचे आवाहन साध्वी भगवंतांनी केले. यावेळी ट्रस्ट पदाधिकारी, विविध महिला मंडळांचे प्रतिनिधी आणि असंख्य भाविक उपस्थित होते.

# 'शिवशैली'तून रंगमंचावर साकारला शिवचरित्राचा थरार

## शिवरायांचा जन्म ते राज्याभिषेकाचा प्रेरणादायी इतिहास जिवंत



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** संत एकनाथ रंगमंदिरात सादर करण्यात आलेल्या 'शिवशैली – शिवशाही संस्कृतीची तेजोमय नृत्यगाथा' या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाने संभाजीनगरकरांची मने जिंकली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण घटनांचा इतिहास नृत्य, अभिनय, संगीत आणि आधुनिक प्रकाशयोजनेच्या माध्यमातून रंगमंचावर प्रभावीपणे उलगडण्यात आला. कार्यक्रमाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

२५ हून अधिक कलाकारांनी शिवरायांचा जन्म, स्वराज्य स्थापनेचा संघर्ष, अफजलखान वध, गनिमी कावा आणि राज्याभिषेक यांसारखे ऐतिहासिक प्रसंग दमदार अभिनयातून साकारले. प्रत्येक प्रसंगाला प्रेक्षकांकडून टाळ्यांचा कडकडाट होत होता. कलात्मक मांडणी, नेपथ्य, संगीत आणि प्रकाशयोजनेमुळे संपूर्ण सभागृह शिवमय वातावरणाने भारावून गेले.

व्हॉट द मीडिया यांच्या पुढाकाराने आणि द डेझर्ट स्टोरी यांच्या सहकार्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आयोजक ऋतुराज घरमोडे यांनी प्रेक्षक, कलाकार, सहकार्य करणाऱ्या संस्था, प्रायोजक आणि माध्यम प्रतिनिधींचे आभार मानत, छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आणि स्वराज्याची प्रेरणा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा सांस्कृतिक उपक्रमांची मालिका पुढेही सुरू राहणार असल्याचे सांगितले.

# छत्रपती संभाजीनगरात व्होक्सवॅगनची नवी डीलरशिप; महाराष्ट्रातील जाळे आणखी मजबूत

## एका दिवसात 10 कार्सची मेगा डिलिव्हरी; पहिल्या 50 ग्राहकांना एक वर्षाचे मोफत सर्व्हिस व्हॅल्यू पॅकेज

हिंदू प्रकाशवार्ता । प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी :** प्रीमियम जर्मन वाहन उत्पादक कंपनी व्होक्सवॅगन इंडियाने छत्रपती संभाजीनगर येथे नव्या डीलरशिपचे उद्घाटन करून महाराष्ट्रातील आपले विक्री व सेवा जाळे आणखी विस्तारले आहे. या उद्घाटनानंतर राज्यातील व्होक्सवॅगनचे नेटवर्क 17 सेल्स लोकेशन्स आणि 16 सर्व्हिस आउटलेट्सपर्यंत पोहोचले आहे. शहरातील वाढत्या प्रीमियम वाहनांच्या मागणीला प्रतिसाद देत ग्राहकांना आधुनिक सुविधा आणि दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा विस्तार करण्यात आला आहे.

मुकुंदवाडी येथील नव्या शोरूममध्ये व्होक्सवॅगनच्या चार प्रमुख मॉडेल्सचे प्रदर्शन करण्यात आले असून त्यामध्ये नवीन टायगन, टायरॉन आर-लाइन, नव्याने दाखल झालेली टायरॉन लाइफ आणि लोकप्रिय प्रीमियम सेडान व्हर्टसचा समावेश आहे. श्री. ऋतुराज देशमुख यांच्या




नेतृत्वाखाली 40 प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची टीम या डीलरशिपमधून ग्राहकांना विक्री व विक्रीनंतरच्या सेवा देणार आहे. याशिवाय चिकलठाणा एमआयडीसी येथे स्वतंत्र स्पेअर्स व सर्व्हिस सेंटरचीही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

छत्रपती संभाजीनगर बाजारपेठेत व्होक्सवॅगनच्या व्हर्टस मॉडेलला सर्वाधिक पसंती मिळत असून कंपनीच्या एकूण विक्रीपैकी सुमारे 65 टक्के वाटा या मॉडेलचा आहे. नव्या डीलरशिपच्या उद्घाटनानिमित्त कंपनीने एका दिवसात 10 वाहनांची मेगा डिलिव्हरी पूर्ण करत शहरातील आपली 3,643 वी कार ग्राहकांच्या ताब्यात दिली. तसेच उद्घाटनानिमित्त पहिल्या 50 ग्राहकांना एक वर्षाचे मोफत सर्व्हिस व्हॅल्यू पॅकेज देण्याची घोषणा करण्यात आली.

यावेळी व्होक्सवॅगन इंडियाचे ब्रँड डायरेक्टर नितीन कोहली यांनी महाराष्ट्र ही कंपनीसाठी महत्त्वाची बाजारपेठ असल्याचे सांगत छत्रपती संभाजीनगर हे टायरॉन आर-लाइन आणि टायरॉन लाइफच्या उत्पादनामुळे विशेष महत्त्वाचे केंद्र असल्याचे नमूद केले. ग्राहकांना जागतिक दर्जाची अभियांत्रिकी, उच्च सुरक्षा मानके आणि उत्कृष्ट ड्रायव्हिंग अनुभव अधिक सुलभपणे उपलब्ध करून देण्यासाठी हा विस्तार महत्त्वाचा टप्पा ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तर मॅनेजिंग डायरेक्टर ऋतुराज देशमुख यांनी उत्कृष्ट विक्री आणि विक्रीनंतरच्या सेवेद्वारे ग्राहकांशी दीर्घकालीन विश्वासाचे नाते निर्माण करण्याची ग्वाही दिली.

# शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीवर भर; पालक अधिकारी अश्विनी लाठकर यांचा विभागनिहाय आढावा

### घरकुल, मनरेगा, जलजीवन मिशन, ग्रामपंचायत प्रशासनासह विविध योजनांच्या प्रगतीचा घेतला आढावा





हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यातील ग्रामपंचायतींमध्ये शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी आणि विकासकामांना अधिक गती मिळावी, यासाठी पंचायत समिती छत्रपती संभाजीनगर येथे मंगळवारी (१४ जुलै) मासिक आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या निर्देशानुसार पालक अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक व प्राथमिक) अश्विनी लाठकर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या बैठकीत विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

बैठकीच्या प्रारंभी पंचायत समितीचे सभापती कल्याण गायकवाड यांनी उपस्थितांचे स्वागत केले. यावेळी गटविकास अधिकारी शिवाजी साळुंके, गटशिक्षणाधिकारी चेतन कांबळे, तालुक्यातील सर्व विभागप्रमुख, विस्तार अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी आणि ग्रामविकास अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत पंतप्रधान आवास, रमाई, शबरी आणि मोदी आवास योजनेसह विविध घरकुल योजनांचा तसेच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत सुरू असलेल्या कामांचा सखोल आढावा घेण्यात आला. याशिवाय ग्रामपंचायतींची सन २०२६-२७ ची कर आकारणी, डिमांड बिले, वार्षिक प्रशासन अहवाल, लेखापरीक्षण पूर्तता, सीएसएमआरडीए क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांवरील कारवाई, 'आपले सरकार' सेवा केंद्रांतील प्रलंबित कामे, ग्राम सुरक्षा, अल्पसंख्याक निधी, जनसुविधा विकासकामे, मनरेगा जॉबकार्ड ई-केवायसी, कृषी व पशुसंवर्धन योजना, जलजीवन मिशन, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, पाणीटंचाई कृती आराखडा, आरोग्य, महिला व बालविकास, समाजकल्याण आणि उमेद (एनआरएलएम) अभियानातील कामांचा आढावा घेण्यात आला.

यावेळी पालक अधिकारी अश्विनी लाठकर यांनी सर्व विभागांनी परस्पर समन्वय ठेवून शासकीय योजनांची उद्दिष्टे विहित मुदतीत पूर्ण करावीत, विकासकामांच्या गुणवत्तेसह गतीवर भर द्यावा आणि छत्रपती संभाजीनगर तालुका विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीत जिल्ह्यात अग्रस्थानी राहण्यासाठी सर्व अधिकाऱ्यांनी प्रयत्नशील राहावे, अशा सूचना दिल्या.

# राम मंदिर देणगीप्रकरणी चौकशीच्या मागणीसाठी शिवसेनेचे रामरक्षा आंदोलन

### रामरक्षा, भीमरूपी स्तोत्र व हनुमान चालीसाचे सामूहिक पठण



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** अयोध्येतील राम मंदिरातील कथित देणगी अपहाराची सखोल चौकशी करावी, या मागणीसाठी शिवसेनेने राज्यभर सुरू केलेल्या 'रामरक्षा आंदोलन' अंतर्गत बुधवारी समर्थनगर येथील श्रीसमर्थ राममंदिरात महाआरती व सामूहिक रामरक्षा पठण करण्यात आले.

यावेळी रामरक्षा, भीमरूपी स्तोत्र आणि हनुमान चालीसाचे सामूहिक पठण करून रामभक्तांनी आंदोलनाला पाठिंबा दर्शविला. आंदोलनाद्वारे राम मंदिर देणगीप्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

या प्रसंगी शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, उपनेते सुभाष पाटील, सहसंपर्कप्रमुख विजयराव साळवे, माजी महापौर सुदाम सोनवणे, शिक्षक सेनेचे पद्माकर इंगळे, उपजिल्हाप्रमुख हिरालाल सलामपुरे व श्रीरंग आमटे पाटील, विधानसभा संघटक गोपाळ कुलकर्णी व विजय सूर्यवंशी, महिला आघाडी संपर्क संघटक सुनीता आऊलवार व सुनीता देव, जिल्हा संघटक आशा दातार, उपजिल्हा संघटक अरुणा भाटी व नलिनी बाहेती, विधानसभा संघटक मीरा देशपांडे तसेच शहरसंघटक सुनीता सोनवणे, वंदना कुलकर्णी यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'दिलेला शब्द पाळला'; चेतनानगर-सईदा कॉलनीत एक कोटींच्या सिमेंट रस्त्यांचे लोकार्पण

### प्रत्येक घटकाच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याची आ. प्रदीप जैस्वाल यांची ग्वाही

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** मध्य विधानसभा मतदारसंघातील हरिओमनगर, चेतनानगर आणि सईदा कॉलनी परिसरातील नागरिकांची अनेक वर्षांची रस्त्यांची मागणी अखेर पूर्ण झाली. सुमारे एक कोटी रुपयांच्या निधीतून उभारण्यात आलेल्या सिमेंट रस्त्यांचे लोकार्पण आमदार प्रदीप जैस्वाल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नागरिकांनी "दिलेला शब्द पाळला" अशी भावना व्यक्त करत जैस्वाल यांचा उत्स्फूर्त सत्कार केला.

कार्यक्रमाला माजी नगरसेवक रुपचंद वाघमारे, मनपा गटनेते किशोर नागरे, राजगौरव वानखेडे, मोईन शेख, अनिल सोनवणे, एजाज शेख, सुमित वाघमारे, शत्रुघ्न दवणे, राहुल जाधव, विठ्ठल औताडे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकार्पण प्रसंगी बोलताना आमदार जैस्वाल म्हणाले, "मतदारसंघातील प्रत्येक मतदार हा माझ्या कुटुंबातील सदस्य आहे. त्यामुळे कोणताही भाग विकासापासून वंचित राहणार नाही. शहरातील सर्वधर्मीय नागरिकांमधील एकोपा कायम ठेवत समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देण्यासाठी मी आणि शिवसेना कटिबद्ध आहोत."

खराब रस्त्यांमुळे महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी आणि सर्वसामान्यांना होणारा त्रास आता संपुष्टात येणार असून नव्या रस्त्यांमुळे वाहतूक अधिक सुरक्षित व सुलभ होईल.

# संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात 'जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त' करिअर संसदेच्या पदाधिकाऱ्यांचा शपथविधी सोहळा उत्साहात संपन्न

हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी



**सोयगाव, दि.१५ जुलै :** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग तथा महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या 'करिअर कट्टा' या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त राज्यभर एकाच वेळी करिअर संसदेतील नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा शपथविधी सोहळा ऑनलाईन आयोजित करण्यात आला होता.या उपक्रमात अजिंठा शिक्षण संस्था संचलित संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथील करिअर संसदेचे पदाधिकारी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले.यावेळी मंचावर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार तसेच प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय सेवा योजना विभागाची कार्यक्रमाधिकारी डॉ.सुनील चौधरे उपस्थित होते.

यावेळी करिअर संसदेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, संवाद कौशल्य, संघटन क्षमता, सामाजिक उत्तरदायित्व आणि रोजगाराभिमुख कौशल्यांचा विकास व्हावा, हा उपक्रमाचा प्रमुख उद्देश असल्याचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पवार यांनी सांगितले.

महाविद्यालयातील करिअर कट्टा समन्वयक डॉ. मनोजकुमार चोपडे,डॉ. संतोष पडघन यांच्या मार्गदर्शनाखाली करिअर संसदेची स्थापना करण्यात आली असून पुढील विद्यार्थी पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली आहे.मुख्यमंत्री - राजरत्न भरत पगारे, नियोजन मंत्री - सविता रतीलाल सोनवणे, कौटुंबिक व शिस्तपालन मंत्री - पल्लवी योगेश बोखारे सामान्य प्रशासन मंत्री - साक्षी मुरलीधर दांडगे , माहिती व प्रसारण मंत्री - दुर्गेश प्रकाश खिरडकर , उद्योजकता विकास मंत्री - पवन शरद मांडवे, रोजगार व स्वयंरोजगार मंत्री - आकाश रवींद्र राठोड, कौशल्य विकास मंत्री - अश्विनी कैलास साळवे, संसदीय कामकाज मंत्री - समृद्धी विनोद काळे, महिला व बालकल्याण मंत्री - नंदिनी राहुल बिऱ्हारे , सदस्य - सानवी बिऱ्हारे .

शपथविधीनंतर सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले असून, आगामी काळात विविध कौशल्यविकास, करिअर मार्गदर्शन, व्यक्तिमत्त्व विकास व रोजगाराभिमुख उपक्रम प्रभावीपणे राबविण्याचा संकल्प करण्यात येणार आहे.

महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविण्याचे आवाहन करिअर कट्टा विभागामार्फत करण्यात आले आहे. तसेच सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना त्यांच्या भावी कार्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# रोटरी क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर न्यू टाऊनचा पदग्रहण समारंभ संपन्न

### सामाजिक उपक्रमांसह नवीन कार्यकारिणीचा पदभार स्वीकार; विद्यार्थी, खेळाडू व विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव



**छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी :** रोटरी क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर न्यू टाऊन (क्लब क्र. 225795, आर.आय. डिस्ट्रिक्ट 3132) यांच्या वतीने सन 2026-27 या वर्षासाठी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण समारंभ मंगळवारी (दि. 14 जुलै) हॉटेल क्युलिनरी कर्मा येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. समारंभाच्या अध्यक्षस्थानी पवन ग्रुपचे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) शिवप्रसाद जाजू हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. रोटरी डिस्ट्रिक्ट 3132 चे सहाय्यक गव्हर्नर रोटेरियन अमित कोर्डे, प्रा. डॉ. बळीराम पांडे, रोटेरियन सतीश लोणीकर, रोटेरियन सरिता लोणीकर, क्लबचे विद्यमान अध्यक्ष रोटेरियन चंद्रकांत कांबळे, संस्थापक सचिव रोटेरियन चंद्रकांत देशपांडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन, दीपप्रज्वलन व सत्काराने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यानंतर रोटेरियन किरण जोशी यांनी अध्यक्षपदाची, रोटेरियन किरणकुमार धोतरे यांनी सचिवपदाची, रोटेरियन गिरीश महाजन यांनी कोषाध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली. तसेच नव्या कार्यकारिणीत डॉ. अफसर शेख, नबी पटेल यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांचाही समावेश करण्यात आला. कार्यक्रमात हर्षवर्धन भामरे, शाहूराज चिले, स्वराज डोंगरे, हर्षदा झौंड, मानसी ठुलसूरकर आणि जयदीप पंढरे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच कुमारी आकांक्षा खरात हिला रोटेरियन किरण जोशी यांच्या सौजन्याने लॅपटॉप भेट देण्यात आला. शिशुविकास मंदिर माध्यमिक शाळा, उस्मानपुरा व श्रेयनगर येथील गुणवंत विद्यार्थी प्रेम राजेंद्र रोकडे, ज्ञानेश्वर अर्जुन शिंदे, तन्मय गजानन जामकर, सायली सुनील परदेशी, योगिता दत्तात्रय दुगाणे आणि ऐश्वर्या किरणकुमार धोतरे यांचा गौरव करण्यात आला. विविध क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचाही सत्कार करण्यात आला. रोटेरियन अमित कोर्डे यांनी रोटरीचा इतिहास, उद्देश व कार्याची माहिती दिली. प्रा. डॉ. बळीराम पांडे यांनी मार्गदर्शन केले, तर प्रमुख पाहुणे शिवप्रसाद जाजू यांनी सामाजिक बांधिलकी जोपासत रोटरीच्या माध्यमातून अधिकाधिक समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नम्रता लालसरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन रोटेरियन किरणकुमार धोतरे यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. त्यानंतर उपस्थितांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले. या पदग्रहण समारंभाच्या यशस्वी आयोजनासाठी नवीन कार्यक्रमातील सर्व सदस्य जून सदस्य तसेच पदाधिकारी यांचे विशेष सहकार्य लाभले, अशी माहिती आयोजकांनी दिली.

# सोयगाव येथे नशामुक्ती अभियानांतर्गत चित्रकला तसेच घोषवाक्य लेखन स्पर्धा संपन्न

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी



**सोयगाव,दि.१५ जुलै :** नशामुक्त भारत अभियानाच्या जनजागृती उपक्रमांतर्गत जिल्हा परीषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथे गटशिक्षणाधिकारी अक्षय धुदल तसेच केंद्रप्रमुख फिरोज तडवी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांसाठी दि.१४ जुलै रोजी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी "व्यसनमुक्त जीवन - निरोगी जीवन" तसेच व्यसनमुक्त गाव या विषयावर उत्स्फूर्त सहभाग नोंदवत अत्यंत सुंदर,आकर्षक आणि संदेशपर चित्रे साकारली.विद्यार्थ्यांनी चित्रांमधून तंबाखू,गुटखा,मद्य व इतर व्यसनांचे दुष्परिणाम,निरोगी जीवनशैलीचे महत्त्व आणि व्यसनमुक्त समाजाची संकल्पना प्रभावीपणे मांडण्यात आली. त्यांच्या कल्पकतेने आणि सामाजिक जाणीवेने स्पर्धेला विशेष उंची मिळाली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये व्यसनांविषयी जागरूकता निर्माण झाली आणि समाजात सकारात्मक संदेश पोहोचविण्यास हातभार लागला.तसेच दि.१५ जुलै रोजी विद्यार्थ्यासाठी घोषवाक्य लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या घोषवाक्य स्पर्धेतून विद्यार्थ्यांनी नशामुक्ती संदर्भात वेगवेगळ्या घोषणाचे लेखन केले. यावेळी सोयगाव गटशिक्षणाधिकारी अक्षय धुदले तसेच सोयगाव केंद्रप्रमुख फिरोज तडवी यानी शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांचा उत्साह व्दिगुणीत करून विद्यार्थ्यांना नक्षामुक्ति विषयावर सखोल मार्गदर्शन करून नशामुक्तीची शपथ दिली. नशामुक्ति जनजागृती साठी शाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील, कला निर्देशक विवेक महाजन,सहशिक्षिका सुरेखा चौधरी,मंगला बोरसे,रामचंद्र महाकाळ,सविता पाटील, प्रतिभा कोळी,अनिल देसाई,पुनम लाड, शुभम देसले यांनी परिश्रम घेतले.

# मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्या राज्यासाठी धोक्याची घंटा : भारत दिघोळे

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्यात यंदाच्या पहिल्या सहामाहीत झालेल्या शेतकरी आत्महत्यांच्या घटना संपूर्ण महाराष्ट्रासाठी धोक्याची घंटा असून, हा केवळ एका प्रदेशाचा नव्हे तर संपूर्ण कृषी व्यवस्थेचा गंभीर प्रश्न असल्याचे महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भारत दिघोळे यांनी म्हटले आहे. प्रसिद्धीपत्रकाद्वारे त्यांनी शासन, प्रशासन, कृषी तज्ज्ञ, शेतकरी संघटना आणि समाजाने एकत्रितपणे शेतकरी वाचविण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले.

दिघोळे यांनी सांगितले की, वाढता उत्पादन खर्च, शेतीमालाला न मिळणारा किफायतशीर दर,हवामानातील अनिश्चितता, कर्जबाजारीपणा आणि बाजारपेठेतील अस्थिरता यामुळे शेतकरी आर्थिक व मानसिक संकटात सापडत आहेत. कांदा, कापूस, सोयाबीन, तूर, द्राक्ष, डाळिंबसह विविध पिकांच्या उत्पादकांना समान अडचणींचा सामना करावा लागत असल्याने हा प्रश्न संपूर्ण कृषी क्षेत्राशी संबंधित आहे.

शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी कृषी अभ्यासक, अर्थतज्ज्ञ, मानसोपचार तज्ज्ञ, सामाजिक संस्था व शेतकरी संघटनांशी चर्चा करून शिफारशी शासनाकडे सादर करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव, स्थिर निर्यात-आयात धोरण, सुलभ कर्जव्यवस्था, बाजारपेठेतील पारदर्शकता आणि दीर्घकालीन कृषी धोरणाला प्राधान्य देण्याची मागणीही त्यांनी केली.

# अभिनंदन! एका कर्तव्यनिष्ठ शिक्षकाचा प्रेरणादायी गौरव




**परतूर :** जिल्हा परिषद, परतूर येथे कार्यरत असलेले आदर्श शिक्षक श्री. कैलास गाडगे सर यांना SIR मधील उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरीबद्दल मा. जिल्हाधिकारी सौ. आशिमा मित्तल, मा. महापालिका आयुक्त सौ. अंजली शर्मा आणि मा. महापौर सौ. वंदनाताई अरुण मगरे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. हा सन्मान केवळ त्यांच्या वैयक्तिक कार्याचा गौरव नसून, शिक्षकाच्या सामाजिक बांधिलकीचा, प्रशासकीय जबाबदारीप्रती असलेल्या निष्ठेचा आणि गुणवत्तापूर्ण कार्याचा सन्मान आहे.*

*कैलास गाडगे सर हे शिस्त, गुणवत्ता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विद्यार्थीकेंद्री अध्यापन यांचा सुंदर संगम आहेत. विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा निर्माण करणे, विज्ञाननिष्ठ विचार रुजविणे आणि शिक्षणाला मूल्यांची जोड देणे, ही त्यांच्या कार्याची खरी ओळख आहे. शिक्षक हा केवळ ज्ञानदाता नसून समाजपरिवर्तनाचा शिल्पकार असतो, याची प्रचीती त्यांच्या कार्यातून सातत्याने येते.*

*मैत्रीमध्ये जिव्हाळा, सहकाऱ्यांप्रती आत्मीयता, समाजाशी असलेली बांधिलकी आणि कुटुंबात संवेदनशीलतेने नाती जपणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व त्यांना अधिक उंचीवर नेते. विशेष म्हणजे, रेल्वे प्रवासादरम्यानही ते प्रत्येक सहप्रवाशाशी अत्यंत प्रेमाने, आपुलकीने आणि काळजीपूर्वक वागतात. गरजू प्रवाशांना मदतीचा हात देणे, ज्येष्ठ नागरिकांची विचारपूस करणे आणि सहप्रवाशांमध्ये स्नेह, विश्वास व सहकार्याची भावना निर्माण करणे हा त्यांच्या स्वभावाचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळे ते केवळ एक आदर्श शिक्षकच नव्हे, तर माणुसकी जपणारे संवेदनशील व्यक्तिमत्त्व म्हणूनही सर्वांच्या मनात विशेष स्थान निर्माण करतात.*

*मा. आशिमा मित्तल, मा. अंजली शर्मा आणि मा. वंदनाताई अरुण मगरे यांच्या हस्ते प्राप्त झालेला हा सन्मान त्यांच्या प्रदीर्घ, निष्ठावान आणि परिणामकारक कार्याची योग्य दखल आहे. त्यांच्या कार्यातून अनेक शिक्षक, विद्यार्थी आणि समाजाला प्रेरणा मिळत राहो, हीच सदिच्छा.*

*डॉ. प्रविण खरात तसेच श्री. विलास पाटील व रेल्वे प्रवासी संघटना यांच्या वतीने आदरणीय श्री. कैलास गाडगे सर यांचे मनःपूर्वक अभिनंदन! त्यांच्या ज्ञानयज्ञाची, समाजसेवेची आणि माणुसकीच्या मूल्यांना समर्पित असलेल्या कार्याची वाटचाल अशीच अधिक तेजस्वी होत राहो, हीच मनःपूर्वक शुभेच्छा!

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911